**भाग 'अ'**

| | |
|---|---|
| धाराशिव येथील जिल्हा न्यायाधीश–२ आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांचे न्यायालयात<br>(पिठासीन अधिकारी अ.सि.आवटे)<br>निकालाचा दिनांक – ०१.०६.२०२६<br>निशाणी – ४४ | |
| फिर्यादी (सा.क्र.१)/<br>तक्रारदार | महाराष्ट्र शासन मार्फत<br>पोलीस निरीक्षक,<br>पोलीस स्टेशन, नळदुर्ग. |
| अभियोग पक्षातर्फे | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एस.सुर्यवंशी |
| आरोपी | साधु उर्फ रघु गुलाब गायकवाड |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | विधीज्ञ पी.ए.माने |

**भाग 'ब'**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ३०.०८.२०२३ |
| फिर्याद दाखल दिनांक | ०१.०९.२०२३ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | ०१.०३.२०२४ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | २४.०६.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १२.०९.२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | २५.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०१.०६.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | -- |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | साधु उर्फ रघु गुलाब गायकवाड | ०१.०९.२३ | २७.०९.२३ | भा.द.वि. कलम ३०७, ३२४, ३२३ व ५०४. | खालील प्रमाणे | .. | २६ दिवस |

## भाग 'क'

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार / न्यायालयीन साक्षीदार

अ. अभियोग पक्षः

| सा.क्रं. | साक्षीदरांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | खंडू राम सुळ | फिर्यादी | १७ |
| २ | स.पो.नि. तायवाडे | तपास अधिकारी | २३ |
| ३ | आशिष रमेश गिरी (पोलीस पाटील) | साक्षीदार | २५ |
| ४ | उमेश रमेश जाधव | साक्षीदार | २६ |
| ५ | कोंडाबाई राम सुळ | साक्षीदार | २८ |
| ६ | ईस्माईल उर्फ बाबा चाँद शेख | साक्षीदार | ३० |
| ७ | विलास रामचंद्र जाधव | साक्षीदार | ३३ |
| ८ | वैजिनाथ सुरेश बचाटे | साक्षीदार | ३४ |

ब. आरोपी पक्षः

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| ०१ | साधु गुलाब गायकवाड | साक्षीदार | ४० |

क. न्यायालयीन साक्षीदारः

| सा.क्रं. | साक्षीदरांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- |

न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निशाणी पी-१/सा.क्र.१ | फिर्यादीवरील फिर्यादीची सही |
| २ | निशाणी पी-२/सा.क्र.१ | फिर्यादीचा फौ.प्र.सं. कलम १६४ अन्वयेचा जबाब. |
| ३ | निशाणी पी-३/सा.क्र.२ | रुग्ण दाखल केलेबाबत पत्र |
| ४ | निशाणी पी-४/सा.क्र.२ | टंकलीखील प्रथम खबरी अहवाल |
| ५ | निशाणी पी-५/सा.क्र.२ | आरोपीचा अटक पंचनामा |
| ६ | निशाणी पी-६/सा.क्र.२ | घटनास्थळाचा ८-अ उतारा. |
| ७ | निशाणी पी-७/सा.क्र.२ | आरोपीचे निवेदन |
| ८ | निशाणी पी-८/सा.क्र.२ | लोखंडी कुऱ्हाड व चाकू जप्ती पंचनामा |
| ९ | निशाणी पी-९/सा.क्र.२ | दिनांक २२.०९.२०२३ रोजीचे तपासी अधिकारी यांनी न्याय वैदयक प्रयोगशाळा सोलापूर यांना दिलेले पत्र |
| १० | निशाणी पी-१०/सा.क्र.२ | तपास अधिकारी यांनी साक्षीदारांचे फौ.प्र.सं. कलम १६४ अन्वयेचा जबाब नोंदविण्याकरिता दिलेले पत्र |
| ११ | निशाणी पी-११/सा.क्र.२ | फिर्यादीचे वैदयकीय प्रमाणपत्र |

| | | |
|---|---|---|
| १२ | निशाणी पी–१२/सा.क्र.५ | साक्षीदार क्र. ५ चा फौ.प्र.सं. कलम १६४ अन्वयेचा जबाब. |
| १३ | निशाणी पी–१३/सा.क्र.२ | साक्षीदार क्र. ४ उमेश जाधव यांच्या जबाबातील अधोरेखांकीत भाग अ. |
| १४ | निशाणी पी–१४/सा.क्र.२ | साक्षीदार क्र. ६ इस्माईल शेख यांच्या जबाबातील अधोरेखांकीत भाग अ. |
| १५ | निशाणी पी–१५/सा.क्र.२ | साक्षीदार क्र. ८ वैजीनाथ बचाटे यांच्या जबाबातील अधोरेखांकीत भाग अ. |
| १६ | निशाणी पी–१६/सा.क्र.२ | तपासी अधिकारी यांनी फिर्यादीचे वैदयकीय प्रमाणपत्र मिळण्याकरिता दिलेले पत्र |

आरोपीतर्फे मान्य केलेली कागदपत्र निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निशाणी १८ | घटनास्थळ पंचनामा (आरोपीने मान्य केला) |
| २ | निशाणी १९ | जप्ती पंचनामा (आरोपीने मान्य केला) |
| ३ | निशाणी २० | जप्ती पंचनामा (आरोपीने मान्य केला) |

मुद्देमालः

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | .. | .. |

दिनांक – ०१.०६.२०२६ (अ. सि. आवटे)

जिल्हा न्यायाधीश–२ आणि अतिरिक्त सत्र

न्यायाधीश,धाराशिव.

| MHOS010002452024 | दाखल दिनांक | - | ०१-०३-२०२४ | | |
|---|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | - | ०१-०३-२०२४ | | |
| | निकाल दिनांक | - | ०१-०६-२०२६ | | |
| | कालावधी | | वर्षे | महिने | दिवस |
| | एकूण - | | ०२ | ०३ | ०० |

धाराशिव येथील जिल्हा न्यायाधीश–२ आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी अ.सि.आवटे)

सत्र खटला क्रमांक ३६/२०२४

निशाणी – ४४

महाराष्ट्र शासन,
मार्फत पोलीस स्टेशन
नळदुर्ग. ... फिर्यादी

**विरुध्द**

साधु उर्फ रघु गुलाब गायकवाड,
वय ४० वर्षे, धंदा – शेती,
रा. वानेगाव, ता.– तुळजापूर,
जि.– उस्मानाबाद. ... आरोपी

---

फिर्यादीपक्षाकरिता – सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एस.सुर्यवंशी.
आरोपींकरिता – विधीज्ञ श्री. पी.ए.माने

---

न्यायनिर्णय

(घोषित केल्याचा दिनांक ०१ जून, २०२६)

१.  आरोपीने भारतीय दंड संहिता कलम ३०७, ३२४, ३२३ व ५०४ प्रमाणे गुन्हा केला आहे असा आरोप आहे. या प्रकरणाची पार्श्वभूमी थोडक्यात खालील प्रमाणे आहे.

२.  फिर्यादी खंडु राम सुळ (सा.क्र.१) हा आपली आई कोंडाबाई (सा.क्र.५) हिचेसोबत मौजे वानेगाव, ता. तुळजापूर, जि. धाराशिव येथे राहत होता. आरोपी साधू उर्फ रघु गुलाब गायकवाड हा सुध्दा वानेगाव येथे राहत होता. आरोपी हा फिर्यादीचा मित्र होता. दोघे ऐकमेकांना ओळखत होते. दिनांक ३०.०८.२०२३ रोजी रात्री ०८.०० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी आपले आईसह घरी हजर होता. तेव्हा आरोपी हा फिर्यादीच्या घरी आला. फिर्यादीने त्याचे आईस चहा करण्याकरिता सांगितले. तेव्हा आरोपीने फिर्यादीच्या मावशीबद्दल वाईट बोलण्यास सुरुवात केली. त्यामुळे फिर्यादीने त्यास 'तु माझा दोस्त म्हणण्याच्या लाईकीचा नाही' असे म्हटले. यावर फिर्यादीला राग येवून त्याने फिर्यादीच्या गच्चीला धरले आणि मारहाण केली. आरोपीने तेथे जवळच असलेली काठी घेतली आणि त्या काठीने फिर्यादीला मारहाण केली. फिर्यादीच्या आईने ती काठी हिसकावून घेतल्यानंतर आरोपीने दगडाने फिर्यादीला मारहाण केली. त्यानंतर आरोपी आपल्या घरी गेला आणि त्याने कुऱ्हाड, व चाकू आणला आणि त्या कुऱ्हाड आणि चाकूने फिर्यादीवर वार केला. या घटनेत फिर्यादीचे डोक्याला गंभीर जखम झाली होती.

३.  या घटनेच्यावेळी गावचे पोलीस पाटील आशिष गिरी (सा.क्र.३) व गावातील इतर लोक हजर होते. त्यांनी भांडणाची सोडवा-सोडव केली. त्यानंतर फिर्यादीच्या आईने एका खाजगी वाहनातून फिर्यादीला तुळजापूर येथील शासकीय रुग्णालयात उपचाराकरिता दाखल केले. फिर्यादीला गंभीर स्वरुपाच्या जखमा असल्यामुळे त्यास पुढील उपचाराकरिता सरकारी दवाखाना, उस्मानाबाद येथे

भरती करण्यात आले. या दरम्यान उपचार चालू असतांना दिनांक ०१.०९.२०२३ रोजी फिर्यादीचा जबाब नोंदविण्यात आला आणि या जबाबाच्या आधारे नळदुर्ग पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला.

४. सहाय्यक पोलीस निरीक्षक तायवाडे (सा.क्र.२) त्यावेळी नळदुर्ग पोलीस स्टेशनला कार्यरत होते. त्यांनी या गुन्हयाचा तपास केला आहे. प्रथम त्यांनी आरोपीचा शोध घेवून त्यास अटक केली. त्यानंतर दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. घटनास्थळावरुन एक काठी, एक चप्पल जोड, रक्त मिश्रीत माती जप्त केली. तपासी अधिकारी यांनी आवश्यक त्या साक्षीदारांचे जबाब नोंदविले. जखमी फिर्यादीचे वैदयकीय दाखला प्राप्त केला. दिनांक ०३.०९.२०२३ रोजी आरोपी पोलीस कोठडीत असतांना त्याने पंचासमक्ष निवेदन दिले. या निवेदनानुसार त्याने या गुन्हयामध्ये वारपलेली कुऱ्हाड आणि चाकू पंचासमक्ष हजर केले. तपासी अधिकाऱ्याने ही दोन्ही हत्यारे या गुन्हयामध्ये जप्त केली. त्यानंतर जप्त केलेले घटक न्याय वैदयक प्रयोगशाळा, सोलापूर येथे तपासणीकरिता पाठविले. संपूर्ण प्रकरणाचा तपास झालेनंतर आरोपीविरुध्द दोषारोपपत्र सादर करण्यात आले.

५. माझे पूर्वधिकारी यांनी निशाणी १२ येथे आरोपीवर दोषारोप निश्चित केला आहे. आरोपीने गुन्हा कबूल केलेला नाही.

६. फिर्यादीपक्षाने दोषारोप शाबीत करण्याकरिता एकूण ०८ साक्षीदार तपासले आहेत. त्याचप्रमाणे लेखी पुरावा सादर केला आहे.

७. आरोपीचा बचाव असा आहे की, त्याने फिर्यादीला लोखंडी कुऱ्हाड, चाकू किंवा काठीने मारहाण केली नाही. फिर्यादी त्याचे घरासमोरील दगडावर पडल्यामुळे त्यास जखम झाली आहे. त्यामुळे या गुन्हयामधून निर्दोष मुक्त करण्याची विनंती केली आहे.

८. या प्रकरणामध्ये मी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एस.सुर्यवंशी आणि आरोपीकरिता विधीज्ञ श्री. पी.ए.माने यांचा युक्तीवाद ऐकला.

९. फिर्यादीपक्षाचा पुरावा, आरोपीचा बचाव आणि उभय बाजूंचा युक्तीवाद विचारात घेता प्रस्तुतचे प्रकरण निकाली काढण्याकरीता खालील वादप्रश्न उपस्थित होतात. या वादप्रश्नांना माझी उत्तरे आणि त्यांची कारणे मी खालीलप्रमाणे नोंदवत आहे.

| अ. क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ३०.०८.२०२३ रोजी रात्री ०८.०० वाजण्याच्या सुमारास वानेगाव येथील फिर्यादीच्या घरामध्ये फिर्यादीचा जीव घेण्याच्या उद्देशाने आरोपीने त्यास काठी, चाकू आणि कुऱ्हाडीने वार केला, ही बाब फिर्यादीपक्षाने शाबीत केली का ? | नाही. |
| २. | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला काठी, चाकू आणि कुऱ्हाड या सारख्या घातक शस्त्राने मारहाण करुन त्यास गंभीर जखम केली, ही बाब फिर्यादीपक्षाने शाबीत केली का ? | नाही. |
| ३. | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला मारहाण केली, ही बाब फिर्यादीपक्षाने शाबीत केली का ? | नाही. |
| ४. | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला त्याचा अपमान करण्याच्या उद्देशाने त्यास शिवीगाळ केली होती, ही बाब | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | फिर्यादीपक्षाने शाबीत केली का ? | |
| ५. | अंतिम आदेश काय? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्रमांक १ ते ४ करिता –**

१०. पुराव्याची व्दीरुक्ती टाळण्याकरिता मी या सर्व मुद्दयांची उत्तरे एकाच ठिकाणी नोंदवत आहे.

११. प्रथम मी फिर्यादीचा पुरावा विचारात घेतो. त्याचा पुरावा निशाणी १७ येथे नोंदविला आहे. फिर्यादीने फिर्यादीस अनुकूल पुरावा दिलेला नाही. फिर्यादीपक्षाने त्यास फितूर घोषित केले आहे. फिर्यादीने असे कथन केले आहे की, लोखंडी खिळयाने त्याच्या पोटावर जखम झाली होती. आरोपीने चाकू, काठी किंवा कुऱ्हाड या हत्याराने मारहाण केल्यामुळे त्यास जखमा झाल्या होत्या ही बाब त्याने नाकारली आहे. फिर्यादीने फिर्यादीवरील त्याची सही मान्य केली आहे. परंतु फिर्यादीमधील मजकूर त्याने मान्य केला नाही.

१२. उलटतपासामध्ये फिर्यादीने असे स्पष्टपणे मान्य केले आहे की, त्याचे घराच्या बाजूला मोठ–मोठे दगड पडलेले आहेत आणि अंधारामध्ये त्या दगडांवर पडल्याने त्याच्या डोक्याला जखम झाली होती.

१३. फिर्यादीपक्षाने पोलीस पाटील आशिष गिरी (सा.क्र.३) यांचा पुरावा निशाणी २५ येथे नोंदविला आहे. त्याच्या पुराव्यावरुन असे दिसून येते की, तो घटनेचा प्रत्यक्ष साक्षीदार नाही. त्याच्या पुराव्यावरुन पुढे असे दिसून येते की, तो जेव्हा घटनास्थळी पोहचला तेव्हा आरोपीची पत्नी आणि मुलगा आरोपीला

आपल्या घरी घेवून जात होते. उलटतपासामध्येसुध्दा या साक्षीदाराने असे मान्य केले आहे की, घटना कशी घडली हे त्याने प्रत्यक्ष पाहिले नाही.

१४. फिर्यादीपक्षाने उमेश जाधव (सा.क्र.४) या साक्षीदाराचा पुरावा निशाणी २६ येथे नोंदविला आहे. परंतु हा साक्षीदारसुध्दा फितूर झाला आहे. त्याने फिर्यादीपक्षास अनुकूल अशी साक्ष दिलेली नाही.

१५. फिर्यादीपक्षाने फिर्यादीची आई कोंडाबाई (सा.क्र.५) हिचा पुरावा निशाणी २८ येथे नोंदविला आहे. तिने मात्र फिर्यादीस अनुकूल असा पुरावा सादर केला आहे. तिच्या पुराव्यावरुन असे दिसून येते की, घटना दिनांक ३०.०८.२०२३ रोजी रात्री ०८.०० वाजण्याच्या सुमारास तिच्या घरामध्ये घडली आहे. घटनेच्यावेळी आरोपी तिचे घरी आला होता. आरोपी हा तिचे बहिणीबद्दल वाईट बोलत होता. तेव्हा फिर्यादीने त्यास असे बोलू नको असे सांगितले. त्यावरुन फिर्यादी आणि आरोपीमध्ये भांडण झाले. या भांडणामध्ये आरोपीने फिर्यादीला काठीने डोक्यात मारहाण केली. त्यानंतर आरोपीने फिर्यादीला दगडानेही मारहाण केली. कोंडाबाईने आरोपीला 'तु तुझ्या घरी निघून जा' असे म्हटल्यावर आरोपी त्याचे घरी गेला आणि कुऱ्हाड, जमीया (चाकू) घेवून आला आणि या हत्याराने फिर्यादीवर वार केला.

१६. फिर्यादीपक्षाने इस्माईल शेख (सा.क्र.६) या साक्षीदाराचा पुरावा निशाणी ३० येथे नोंदविला आहे. हा साक्षीदारसुध्दा फितूर झाला आहे आणि त्याने फिर्यादीपक्षास अनुकूल असा पुरावा सादर केलेला नाही.

१७. फिर्यादीपक्षाने पोलीस हवलदार विलास जाधव (सा.क्र.७) याचा पुरावा निशाणी ३३ येथे नोंदविला आहे. त्याच्या पुराव्यावरुन असे दिसून येते की, दिनांक ०१.०९.२०२३ रोजी तो नळदुर्ग पोलीस स्टेशन येथे कार्यरत होता.

वरिष्ठांच्या आदेशाने त्याने सरकारी दवाखाना, धाराशिव येथे जावून जखमी फिर्यादीचा जबाब नोंदविला आहे.

१८. फिर्यादीपक्षाने वैजीनाथ बचाटे (सा.क्र.८) या साक्षीदाराचा पुरावा निशाणी ३४ येथे नोंदविला आहे. फिर्यादीपक्षाच्या मते हा साक्षीदार घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. परंतु हा साक्षीदार सुध्दा फितूर झाला आहे.

१९. फिर्यादीपक्षाने तपास अधिकारी स.पो.नि. तायवाडे (सा.क्र.२) यांचा पुरावा निशाणी २३ येथे नोंदविला आहे.

२०. या प्रकरणामध्ये आरोपीने घटनास्थळ पंचनामा (निशाणी १८), जप्ती पंचनामा (निशाणी १९ व २०) मान्य केले आहेत. त्याचप्रमाणे निशाणी ११ येथील वैदयकीय दाखलासुध्दा मान्य केला आहे.

२१. आरोपीने आपला पुरावा निशाणी ४० येथे नोंदविला आहे. आरोपीने असे कथन केले आहे की, निशाणी पी–७ येथील पंचनामा त्याचे वकीलांनी नजर चुकीने मान्य केला आहे. त्यामुळे त्यास निशाणी दिले आहे. वस्तुतः हा पंचनामा त्यास मान्य नाही.

२२. फिर्यादी आणि आरोपीने सादर केलेल्या वरील पुराव्यावरुन मी असा निष्कर्ष काढला आहे की, या प्रकरणामध्ये फिर्यादीने फिर्यादीपक्षास अनुकूल साक्ष दिलेली नाही. फिर्यादी हा फितूर झाला आहे. ही या प्रकरणातील सर्वात महत्वाची उणीव आहे. जखमी फिर्यादीच फितूर झाल्यामुळे फिर्यादीपक्षाच्या संपूर्ण प्रकरणावरच प्रश्न चिन्ह उभा राहते. त्याचप्रमाणे या गुन्हयातील इतर महत्वाचे साक्षीदार इस्माईल शेख, वैजीनाथ बचाटे हेसुध्दा फितूर झाले आहेत. त्यामुळे या दोन्ही साक्षीदारांचा पुरावा फिर्यादीपक्षास दोषारोप शाबीत करण्यास उपयुक्त नाही. पोलीस पाटील आशिष गिरी यांचे पुराव्यावरुन असे दिसून येते की, तो घटनेचा

प्रत्यक्ष साक्षीदार नाही. त्यामुळे त्याचा पुरावा फारसा विश्वासहार्य नाही. या प्रकरणामध्ये फिर्यादीपक्षाने फिर्यादीमधील मजकूर शाबीत केलेला नाही. फिर्यादीने फिर्यादीमधील मजकूर नाकारला आहे. पोलीस हवलदार जाधव हे फिर्यादीमधील मजकूर शाबीत करु शकले नाही. त्यामुळे फिर्यादीपक्ष या प्रकरणामधील फिर्याद शाबीत केली नाही असा निष्कर्ष मी काढला आहे.

२३. या प्रकरणातील फिर्यादीची आई कोंडाबाई हिने फिर्यादीपक्षास अनुकूल असा पुरावा सादर केला आहे. परंतु केवळ तिचा पुरावा दोषारोप शाबीत करण्यास पुरेसा नाही. वर नमूद केल्याप्रमाणे या घटनेतील महत्वाचे साक्षीदार फितूर झाले आहेत. त्याचप्रमाणे ज्या हत्याराने आरोपीने फिर्यादीवर वार केला होता ते हत्यारसुध्दा फिर्यादीपक्षाने न्यायालयासमारे हजर केले नाही. आरोपीने जरी निशाणी पी–७ येथील निवेदन पंचनामा मान्य केला असला तरी जोपर्यंत या निवेदन पंचनाम्यानुसार जप्त केलेले हत्यार न्यायालयासमारे हजर केले जात नाही, तोपर्यंत या निवेदन पंचनाम्याला काहीही अर्थ प्राप्त होत नाही.

२४. आरोपीने या प्रकरणामध्ये असा बचाव घेतला आहे की, फिर्यादी हा त्याचे घराजवळ दगडावर पडल्यामुळे त्यास जमख झाली आहे. फिर्यादीने त्याच्या उलटतपासामध्ये ही बाब पूर्णपणे मान्य केली आहे.

२५. त्यामुळे मी असा निष्कर्ष काढला आहे की, वादप्रश्न क्र. १ ते ४ शाबीत करण्यास फिर्यादीपक्षास अपयश आले आहे. म्हणून मी त्यांची उत्तरे नकारार्थी नोंदविले आहेत.

**वादप्रश्न क्रमांक ५–**

२६. वरील विवेचणावरुन हे स्पष्ट होते की, आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. या निष्कर्षावरुन मी खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करतो.

## आदेश

१. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३५ (१) अन्वये आरोपी साधु उर्फ रघु गुलाब गायकवाड यांना नळदुर्ग पोलीस स्टेशन गु.र.नं.४१४/२०२३ भारतीय दंड संहिता कलम ३०७, ३२४, ३२३ व ५०४ या गुन्हयातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे जातमुचलके रद्द करण्यात येतात.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये रुपये ५०,०००/– चा वैयक्तीक जातमुचलका दयावा.

ANANT SIDDHESHWAR AWATE
Digitally signed by ANANT SIDDHESHWAR AWATE
Date: 2026.06.01 16:53:10 +0530

दिनांक – ०१.०६.२०२६ (अ. सि. आवटे)

जिल्हा न्यायाधीश–२ आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीश,धाराशिव.

# C E R T I F I C A T E

| | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment. | | |
| Name of Stenographer | - | L.S.Patil Stenographer Grade -I |
| Court | - | District Judge-2 and Additional Sessions Judge, Dharashiv (Osmanabad) |
| Date of order/Judgment | - | 01.06.2026 |
| Date of order/judgment signed by presiding officer. | - | 01.06.2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 01.06.2026 |